# Sprouting Minds



# Cover page Description

**"We love to do things that come from our heart."**


**We all have heard of this phrase. Sevankur sits in our heart and directs the brain making us better human being. Not just that, it also shapes our personality, reveals our true selves to us, showing us our strengths and weaknesses, strengthens our roots, and helps us design our lives for the future of humankind.**

# The Editorial Board



Scan this Qr code to get the details of our Editorial Board Team










# Index

## Articles From The Roots

1 The New Beginning – Dr. Jayesh Talankar

3 Why Sevankur -Dr. Prasanna Patil

8 Sevankur -एक चळवळ -Dr. Ashwinikumar Tupkary

10 DHR And Sevankur -Dr. Avinash Buche

12 Shri Guruji Rugnalaya -Prakalpa Darshan -Dr. Jayesh Talankar




## Articles From The Sprouts

15 Balance Your IQ And EQ -Ninad Deshpande

18 Why Everyone Should Have An Elder Sibling -Gautami Kandalgaonkar

19 COVID & Sevankur -Arpita Paratkar

SEVANKUR BHARAT
www.sevankurbharat.org



## Sprouting Gallery


21 POEM- I Shall Always Be There –Vedant Shrigire

21 POEM- जरा बदलून बघ –Sakshi Baldi


22 Sketch –Dr. Rahul Gawas

23 Painting – Amisha Petkar


## Miscellaneous


24 Sevankur News

# THE NEW BEGINNING



**"नमस्कार!**

## सेवांकुर-भारत चे पाहिले बौध्दीक पत्रक सादर करत असताना सर्व बौध्दीक टीमला आनंद होत आहे..."

आणि ते साहजिकच आहे, कल्पनेला मूर्त स्वरूप येणं ही नक्कीच आनंददायी गोष्ट आहे.
सेवांकुरच्या टीम मध्ये कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांना सेवांकुरचा एकुण प्रवास पाहून सुचलेले अर्थपुर्ण नांव....

## Sprouting Minds..

वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये समाजभान, संवेदनशीलता, नैतिकता जागृत करणे, त्याशिवाय वैद्यकीय व्यवसाय हे केवळ पैसे मिळवण्याचे साधन नसून ते एक समाज सेवेचे व्यासपीठ आहे, असा सेवाभाव मनामध्ये अंकुरीत करणे, यासाठीच सेवांकुर ची सुरुवात झाली व तोच विचार देण्याचा प्रयत्न या पत्रकातून आम्ही करणार आहोत.
बौद्धिक टीम च्या विद्यार्थ्यांनी आपल्या सेवांकुरच्या बौद्धिक पत्रिकेत काय काय असावे ? त्याचे Design कसे असावे ? त्याला पानं किती असावेत ? त्याचे नांव काय असावे? ते कोणत्या भाषेत असावे? त्याच बरोबर कोणी काय जबाबदारी घ्यायची?, कधी पर्यंत पूर्ण करायचे यांची बैठकामधून भरपुर चर्चा केली आणि या सविस्तर विचार मंथनातुन बाहेर पडले ते **Sprouting Minds** नावाचे विचार अमृत.



**स्वामी विवेकानंद म्हणतात की, "Tell me the songs on the lips of youth and I will tell you the future of that country..." मुळातच सामाजाप्रती संवेदनशील असलेल्या आपल्या भारतीय तरुणाला "देश हमें देतो है सबकुछ हम भी तो कुछ देना सीखे" हे गीत ओठी देण्यासाठीचा हा एक प्रयत्न**



Dr. Jayesh Talankar

बौद्धिक प्रमुख, देवगिरी प्रांत

**Editor - In - Chief**

**तर काय असणार आहे या**
***SPROUTING MINDS* मध्ये ?**

**१. सेवांकुरच्या उगमापासुन ते आज पर्यंतच्या प्रवासावर दृष्टीक्षेप.**
**२. सेवांकुरच्या भविष्यातील *ACTIVITY* काय असतील.**
**३. सेवांकुर विषयी विद्यार्थ्यांचे विचार.**
**४. ज्या प्रकल्प दर्शनाने विद्यार्थ्यांच्या मनात सेवाभाव अंकुरीत झाला अशा काही सामाजिक सेवा प्रकल्पांची माहिती.**
**५. प्रेरणादायी व्यक्तीचरित्र.**
**६. विद्यार्थ्यांना मुक्तपणे विचार व्यक्त करता यावे असेही *PROVISION***

तर काय असणार आहे या Sprouting Minds मध्ये ?

१ .सेवांकुरच्या उगमापासुन ते आज पर्यंतच्या प्रवासावर दृष्टीक्षेप.
२. सेवांकुरच्या भविष्यातील Activity काय असतील.
३. सेवांकुर विषयी विद्यार्थ्यांचे विचार.
४. ज्या प्रकल्प दर्शनाने विद्यार्थ्यांच्या मनात सेवाभाव अंकुरीत झाला अशा काही सामाजिक सेवा प्रकल्पांची माहिती.
५. प्रेरणादायी व्यक्तीचरित्र.
६. विद्यार्थ्यांना मुक्तपणे विचार व्यक्त करता यावे असेही Provision

अशा प्रकारे हा सेवांकुरच्या विद्यार्थ्यांनी, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केलेला विचाराचा एक Platform आहे.
स्वामी विवेकानंद म्हणतात की, "*Tell me the songs on the lips of youth and I will tell you the future of that country...*"
मुळातच सामाजाप्रती संवेदनशील असलेल्या आपल्या भारतीय तरुणाला "**देश हमें देतो है सबकुछ हम भी तो कुछ देना सीखे"** हे गीत ओठी देण्यासाठीचा हा एक प्रयत्न.
एका अर्थाने सेवांकुर चे हे बौद्धिक पत्रक सर्व वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी एक मेजवानीच असणार आहे.
हे पत्रक Lead and Create करणा-या विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे प्रतिबिंब असेल.
सेवांकुरचा विचार प्रत्येक वैद्यकीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावा ह्या करीता सेवांकुरच्या विद्यार्थ्यांनी केलेला हा अभिनव उपक्रम आहे.
सर्वांना हा उपक्रम नक्कीच आवडेल.

**Sprouting Minds पत्रिकेच्या Content वर काम करणारी, Design वर काम करणारी, Data Collect करणारी टीम या सर्वांचे खुप खुप अभिनंदन आणि आपल्या या Activity ला शुभेच्छा..**






**शिव खेरांच्या पुस्तकातली एक छान गोष्ट आहे. एक तरुण एक अत्यंत भारीची नवी कोरी मोटरसायकल चालवीत मित्रांकडे येतो आणि अतिशय आनंदाने नवी गाडी मित्रांना दाखवतो. मित्र विचारतात, “केवढ्याला पडली?” तो म्हणाला, “मला किंमत नाही माहीत. मला माझ्या भावाने भेट म्हणून विकत घेऊन दिली आहे ही गाडी!” “वॉव! मला पण असा उदार आणि श्रीमंत भाऊ असायला पाहिजे होता यार!” एकजण उत्स्फूर्तपणे म्हणतो आणि बाकी सगळे त्याला दुजोरा देतात. त्यांच्यातील एक मित्र मात्र असं काहीच बोलत नाही. त्यावर सगळे त्याला विचारतात- “तुला नाही का असं वाटत की आपल्यालाही अशी भारी गिफ्ट देऊन आनंदित करणारा भाऊ असावा?” त्यावर तो सावकाश पण ठामपणे म्हणतो- “त्यापेक्षा दुसऱ्याला आनंद देणारा- गाडी घेऊन देणारा, तो भाऊ मी असायला पाहिजे होतो!”**

स्वत: आनंदी राहत, कर्तृत्ववान होत, आपल्या कर्तृत्वाने आणि सकारात्मकतेने समाजात बदल घडवणारी जी गुणी मंडळी दिसतात त्या सर्वांमध्ये एक गोष्ट सारखी असते- ती म्हणजे, त्यांच्या जडणघडणीच्या वयात त्यांना सामूहिकता, सकारात्मकता आणि सक्रियता यांचे महत्व पटवून देणारे संस्कार झालेले असतात. त्या वयातच त्यांना ‘मी आणि अवतीभोवतीचा माझा समाज’ याचे भान, म्हणजेच ‘समाजभान’ आलेले असते. त्यामुळे मग पुढे ते कुठेही गेले तरी, कोणत्याही नोकरी- व्यवसायात ते उतरले तरी, त्यांचे हे समाजभान सुटत नाही. व्यक्तिगत आयुष्यात नकारात्मकता, हिंसा, द्वेष यापासून त्यांना सहजच दूर राहता येते आणि आपले व्यक्तिमत्व घडवण्याबरोबरच समाजात देखील; अगदी ‘डेल्टा-एक्स’ प्रमाणे सूक्ष्म का असेना; पण निश्चित बदल पण घडवता येतो! आयुष्य यशस्वी होण्याबरोबरच ‘सार्थक’ देखील बनते!



अशाच कांही तरुणांना ऐंशीच्या दशकात औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयात ते शिकत असताना ‘समाजभान’ सापडले आणि डॉ. हेडगेवार रुग्णालय उभे राहिले. आज वैद्यकीय आणि सामाजिक विषयातील परिवर्तनाच्या चळवळीचे रूप त्या प्रकल्पाने घेतले आहे. हा ठेवा सतत पुढच्या पिढ्यांतील तरुणांना मिळावा याची बीजे चोवीस वर्षांपूर्वी टाकायला सुरुवात झाली आणि त्यातूनच आजचे ‘सेवांकुर’ उमलले आहे!

वैद्यकशास्त्र आणि शिक्षण या दोन्ही गोष्टी भारतीय संस्कृतीत अगदी पुरातन काळापासून पवित्र, आदरणीय मानल्या जातात. भारतीयांच्या दृष्टीने हे दोन्ही केवळ ‘व्यवसाय’ नव्हते, तर धर्मकार्य मानले जायचे. म्हणूनच वैद्य आणि गुरु यांना त्यांच्या त्यांच्या विषयांच्या पलीकडे देखील व्यापक मान्यता होती. सामाजिक बदल घडवून आणण्यात, लोकांचे प्रबोधन करण्यात त्यांची मोठी भूमिका असायची कारण लोकांचा त्यांच्यावर असलेला अपार विश्वास. आधुनिक काळातही ‘A Doctor can be an effective Social Changemaker’ असेच म्हटले जाते. गेली कांही दशके मात्र सामान्य जन आणि डॉक्टर्स यांच्यातील हे नाते विस्कळीत होत गेलेले दिसते. सेवांकुरने या नात्याला पुन्हा मजबूत बनवण्यासाठी कामाला सुरुवात केली आणि पाहता पाहता हजारो तरुण डॉक्टरांच्या पर्यन्त ही चळवळ पोहोचली देखील!
वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये सेवांकुर इतकं लोकप्रिय का आहे? यातून काय मिळतं या तरुणांना? कुठल्याही सेवांकुराईट बरोबर दहा मिनिटं बोललात तर याचं उत्तर मिळेल! झारखंडच्या एका कोपऱ्यातील घनदाट जंगलातल्या एका आदिवासी पाड्यावर दुसऱ्या दिवशी कॅम्प घेण्यासाठी चार सेवांकुराईट्स पोहोचतात. किर्र अंधारी रात्र पडलेली असते. तरीही गावातील आबालवृद्ध त्यांच्या स्वागताला जमलेले असतात. ओळखपाळख नाही, भाषा कळत नाही तरी कुणी माऊली त्यांच्यासाठी गरमागरम जेवण रांधते, अगत्याने त्यांना जेऊ घालते. थोड्याच वेळात ते त्या परिवाराचा एक भाग बनून जातात. शाळेत असताना आपण रोज प्रार्थना म्हणतो- ‘सारे भारतीय माझे बांधव आहेत’. ती बंधुत्वाची; सगळा समाज माझा आहे, याची अनुभूती वैद्यकीय विद्यार्थ्यांना इथे साक्षात मिळते!

आपला देश, आपला समाज यांचा विकास झाल्याशिवाय माझ्या विकासाला अर्थ नसतो. व्यक्ती आणि समष्टी हे नातं परस्परावलंबी आहे. म्हणून आपला सगळा समाज कसा आहे? त्याच्या समस्यांचे आणि शक्तीचे दर्शन होणे आवश्यक असते. सेवांकुर हे उत्तम घडविते. विविध सेवा प्रकल्पांना भेटी देणाऱ्या, तिथे राहून काम करून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया बोलक्या असतात. ‘दुनिया में कितना गम है- मेरा गम कितना कम है’ हे कळतं! एक संवेदनशील माणूस आणि डॉक्टर म्हणून रोग आणि वेदना दूर करण्याबरोबरच दैन्य, अभाव आणि भेदभाव दूर करण्यातही मी काय करू शकतो हे देखील लक्षात येतं. सेवांकुर केवळ अशी संवेदनशील मनं घडवतं एवढच नाही, तर अशा संवेदनशील मनांना एकत्र बांधून ठेवणं आणि तरुणाईची अफाट ऊर्जा सकारात्मक कामांत लावणं हे ही करतं. महाराष्ट्रातल्या प्रत्येक मोठ्या शहरात आज सेवांकुराईट्स नित्य एकत्र येतात, खेड्यात जातात, सेवाकार्य करतात, प्रबोधन करतात- स्वत: समाधान मिळवतात; लोकांना आनंद आणि प्रेरणाही देतात. कोरोना काळात सेवांकुरच्या विद्यार्थ्यांनी अनेक शहरांत निर्भयपणे प्रत्येक गल्लोगल्ली जाऊन तपासणी आणि प्रबोधन केले त्याचे सर्व समाजाने कौतुक केले. आरोग्य सर्वेक्षण, प्रबोधन, आपत्तीमध्ये मदत, पर्यावरण संरक्षण अशा अनेक विषयांत सेवांकुरची तरुणाई कामाला लागली आहे. म्हणूनच महाराष्ट्राचे **मा. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी** यांना तब्बल शंभर सेवांकुराईट्स सोबत- अगदी आजोबांनी नातवंडांसोबत गप्पा माराव्या अशा अनौपचारिक स्नेहाने- गप्पागोष्टींना वेळ द्यावसा वाटला; सेवांकुरचे कौतुक करावेसे वाटले! इतकेच नव्हे, तर भारताचे मा. राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांनी देखील सेवांकुरच्या टीमला भेटीची वेळ दिली व आस्थेने या कामाची दखल घेतली!

**वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये सेवांकुर इतकं लोकप्रिय का आहे?**
**झारखंडच्या एका कोपऱ्यातील घनदाट जंगलातल्या एका आदिवासी पाड्यावर दुसऱ्या दिवशी कॅम्प घेण्यासाठी चार सेवांकुराईट्स पोचतात. किर्र अंधारी रात्र पडलेली असते. तरीही गावातील आबालवृद्ध त्यांच्या स्वागताला जमलेले असतात. ओळखपाळख नाही, भाषा कळत नाही तरी कुणी माऊली त्यांच्यासाठी गरमागरम जेवण रांधते, अगत्याने त्यांना जेऊ घालते. थोड्याच वेळात ते त्या परिवाराचा एक भाग बनून जातात. शाळेत असताना आपण रोज प्रार्थना म्हणतो- ‘सारे भारतीय माझे बांधव आहेत’. ती बंधुत्वाची; सगळा समाज माझा आहे, याची अनुभूती वैद्यकीय विद्यार्थ्यांना इथे साक्षात मिळते!**

सेवांकुर जे काम करतं त्याची गरज वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील दिग्गजांना देखील हळूहळू समजायला लागली आहे. “Good medical leadership is the key to build high-quality healthcare. However, in the development of medical careers, the teaching of leadership has traditionally not equaled that of technical and academic competencies. There has been an increased drive to see leadership education for doctors starting earlier. (*Tzu Chi Medical Journal; “Medical Leadership: An important and required competency for medical students” 2018)*
किंवा "Social Orientation of Medical Education in India." या Economic and Political Weekly मधील D. Banerjee यांच्या लेखातही “In India, the Medical students rarely learn about the intersection of socio-economic and environmental effects on access to healthcare... ... With a 360 degree perspective of society and tinge of leadership; a clinician can be a social change-maker in the developing countries like India. Unfortunately; our medical education system doesn’t provide firm solutions to these gaps” या शब्दांत हीच गरज अचूकपणे मांडलेली दिसते. सेवांकुर नेमकेपणाने याच दोन मुद्द्यांवर “Social Orientation” आणि “Leadership” यावर काम करते!



Dr. Prasanna Patil
निमंत्रित सदस्य
prasanna-patil@hedgewar.org

**बऱ्याच वेळा लोक तरुणाईविषयी नकारात्मक सूर लावताना दिसतात! ‘आजकालच्या मुलांना शिस्त नाही’ सारखे शेरे येत असतात. २०१८ मध्ये सेवांकूरच्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमासाठी- ‘एक सप्ताह देश के नाम’ कार्यक्रमासाठी २७० वैद्यकीय विद्यार्थी आणि ३० डॉक्टर्स मुंबईहून मध्यप्रदेशात चित्रकूटला ट्रेनने निघाले होते. रेल्वेतील सहप्रवाशांना वाटत होतं, ही एवढी तरुण पोरं बसलीयत. आता हुल्लडबाजी तर होणार नाही ना! पुण्यापासून बसलेले श्री. असिमार पण याच चिंतेत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ट्रेन जबलपूरच्या आसपास असताना त्यांनी "तुमच्या प्रमुखाला मला भेटायचं आहे," अशी इच्छा व्यक्त केली. मुलांनी डॉ. तुपकरी सरांना बोलावले. त्यावेळी श्री असिमार यांनी ‘एक सप्ताह...’ काय आहे? सगळं व्यवस्थापन पण बहुतांश मुलंच सांभाळताहेत व ते पण शिस्तीत; हे कसं? आदी प्रश्नांची सरबत्ती केली. सेवांकुरबद्दल ऐकल्यावर त्या निवृत्त आर्मीमॅनच्या तोंडून उत्स्फूर्त उद्गार निघाले, "ये असली काम है जी!’ ‘मै कोई अमीर आदमी तो नही, पर इसमें कुछ सहयोग देना चाहता हूं" म्हणत सेवांकुरला उत्स्फूर्तपणे पाचशे रुपयांची देणगी पण दिली!**

बऱ्याच वेळा लोक तरुणाईविषयी नकारात्मक सूर लावताना दिसतात! ‘आजकालच्या मुलांना शिस्त नाही’ सारखे शेरे येत असतात. २०१८ मध्ये सेवांकुरच्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमासाठी- ‘एक सप्ताह देश के नाम’ कार्यक्रमासाठी २७० वैद्यकीय विद्यार्थी आणि ३० डॉक्टर्स मुंबईहून मध्यप्रदेशात चित्रकूटला ट्रेनने निघाले होते. रेल्वेतील सहप्रवाशांना वाटत होतं, ही एवढी तरुण पोरं बसली आहेत. आता हुल्लडबाजी तर होणार नाही ना! पुण्यापासून बसलेले श्री. असिमार पण याच चिंतेत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ट्रेन जबलपूरच्या आसपास असताना त्यांनी ‘तुमच्या प्रमुखाला मला भेटायचं आहे,’ अशी इच्छा व्यक्त केली.

**२०२० च्या 'एक सप्ताह..' मध्ये झारखंडच्या बिशूनपूर येथे पहिल्या दिवशी सगळ्यांचं जेवण झालं त्यावेळी आपआपल्या सवयीप्रमाणे किंवा नेहमीपेक्षा निराळ्या पद्धतीचे पदार्थ असल्याने; अनेकांनी ताटात कांही न कांही अन्न टाकून दिलेलं. ३०० जणांच्या भोजनानंतर सुमारे चार पाच किलो अन्न असं टाकून दिलेलं आढळलं. सेवांकुरच्या वतीने त्यावेळी 'झीरो फूड वेस्टेज' ची कल्पना मुलांना सांगितली आणि काय आश्चर्य... पाचव्या दिवशी खरोखर अन्न वाया घालण्याचं प्रमाण शून्यावर आलेलं! कुठून येते सेवांकुरच्या विद्यार्थ्यांमध्ये ही स्वयंशिस्त? ती येते रोल मॉडेल्स समोर ठेवल्याने!**

मुलांनी डॉ. तुपकरी सरांना बोलावले. त्यावेळी श्री असिमार यांनी 'एक सप्ताह...' काय आहे? सगळं व्यवस्थापन पण बहुतांश मुलंच सांभाळताहेत व ते पण शिस्तीत; हे कसं? आदी प्रश्नांची सरबत्ती केली. सेवांकुरबद्दल ऐकल्यावर त्या निवृत्त आर्मीमॅनच्या तोंडून उत्स्फूर्त उद्गार निघाले, 'ये असली काम है जी!' 'मै कोई अमीर आदमी तो नही, पर इसमें कुछ सहयोग देना चाहता हूं' म्हणत सेवांकुरला उत्स्फूर्तपणे पाचशे रुपयांची देणगी पण दिली!
सेवांकुरचे प्रमुख कार्यक्रम 'एक सप्ताह देश के नाम' किंवा 'उन्हाळ्यातील व्यक्तिमत्व विकास शिबीर' यातून जल्लोष, उत्साह याबरोबरच ठळकपणे लक्षात येते ती विद्यार्थ्यांची शिस्त आणि तन्मयता!
या कार्यक्रमातील दिनक्रम मुद्दामच जरा जाचक वाटतील असे ठेवलेले असतात. सकाळी लवकर उठणे, दिवसभर व्यस्तता. पहिल्यांदाच अशा दिनक्रमाचा अनुभव घेणारी बहुतेक मंडळी; पण कुठंही कुरकुर नाही; उशीर नाही! वेगवेगळे सामाजिक विषय चर्चेला असतात. पण तेही विद्यार्थी गंभीरपणे समजून घेतात.
२०२० च्या 'एक सप्ताह..' मध्ये झारखंडच्या बिशूनपूर येथे पहिल्या दिवशी सगळ्यांचं जेवण झालं त्यावेळी आपआपल्या सवयीप्रमाणे किंवा नेहमीपेक्षा निराळ्या पद्धतीचे पदार्थ असल्याने; अनेकांनी ताटात कांही न कांही अन्न टाकून दिलेलं. ३०० जणांच्या भोजनानंतर सुमारे चार पाच किलो अन्न असं टाकून दिलेलं आढळलं. सेवांकुरच्या वतीने त्यावेळी 'झीरो फूड वेस्टेज' ची कल्पना मुलांना सांगितली आणि काय आश्चर्य... पाचव्या दिवशी खरोखर अन्न वाया घालण्याचं प्रमाण शून्यावर आलेलं! कुठून येते सेवांकुरच्या विद्यार्थ्यांमध्ये ही स्वयंशिस्त? ती येते रोल मॉडेल्स समोर ठेवल्याने! सेवांकुरच्या सुरुवातीच्या बॅचेस मधील विद्यार्थी कार्यकर्ते आता यशस्वी डॉक्टर्स होऊन या चळवळीचे नेतृत्व करत आहेत. त्यांच्या अवतीभवती वावरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत 'आपणही यांच्यासारखे होऊ' ही प्रेरणेची चमक स्पष्ट दिसते. सेवांकुर असे समर्थ नेतृत्व देखील घडवत आहे. सेवांकुरच्या प्रत्येक उपक्रमाच्या नियोजनात विद्यार्थ्यांची मोठी भूमिका असते. व्यवस्थापनशास्त्राचे धडे आम्हाला इथेच मिळतात, अशी भावना सेवांकुरचे विद्यार्थी त्यामुळेच बोलून दाखवतात.




व्यक्तिमत्व विकास हा सेवांकुरच्या कामाचा प्राण! सेवांकुरच्या कार्यक्रमात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या प्रतिक्रिया सर्व कांही सांगतात. आपल्या पाल्यात झालेले सकारात्मक बदल त्यांनाच आश्चर्यकारक वाटतात. किरण अल्हाट या सेवांकुराईटचे वडील अंकुश अल्हाट सेवांकुरच्या प्रमुखांना सांगत होते, "हा पोरगा आता तुमच्याकडंच दिलाय! त्याला कसं घडवायचं, त्याला काय काम सांगायचं.. तुम्हीच ठरवा!" पालकांचा हा विश्वास सेवांकुरची सर्वात मोठी कमाई! 'एक सप्ताह..' कार्यक्रमात अगदी दुर्गम भागातही येणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या विद्यार्थ्यांपेक्षा जरा अधिकच असते! सुरक्षा आणि कौटुंबिक वातावरणातून जिव्हाळा याची पालकांना खात्री असल्यानेच हे शक्य होते!

आजकाल आपल्या प्रोफेशनल शिक्षणाबरोबरच सॉफ्ट स्कील्स शिकण्याचे महत्व आपल्याला उमगले आहे. उत्तम संभाषण कौशल्य, उत्तम श्रवणकौशल्य किंवा आयुष्याकडे बघण्याची सम्यक दृष्टी जेवढी लवकर मिळेल, तेवढा तो डॉक्टर प्रभावी आणि यशस्वी होतो. याचे विशेष प्रयत्न सेवांकुरच्या ज्या ज्या शहरांत शाखा आहेत, तिथे नियमितपणे होत असतात.

उपनिषदामध्ये 'श्रेयस' आणि 'प्रेयस' अशा कल्पना सांगितल्या आहेत. पैसा, प्रसिद्धी, सत्ता, ह्या गोष्टी 'प्रेयस' मध्ये येतात. आपण जे करतो, बोलतो, जगतो, त्यामध्ये आपल्या असण्याचा हेतू मिसळला गेला की 'श्रेयस' कडे प्रवास सुरु होतो. त्यातून हळूहळू जगणे अर्थपूर्ण होते. स्वतःच्या जगण्यातला अर्थ सापडतो. 'प्रेयस' मिळवून मग 'श्रेयस' कडे जाण्यासाठी काही विशेष संस्कारांची गरज असते. वैद्यकीय विद्यार्थ्यांना लौकिक अर्थांनी यशस्वी बनवण्याबरोबरच त्यांचं 'श्रेयस' पण त्यांना मिळावं यासाठीच्या प्रयत्नांची साखळी म्हणजे सेवांकुर!

सेवांकुरची आजवरची ही वाटचाल आश्वासक असली तरी अजून खूप पल्ला गाठायचा आहे. आणि तुम्हा सर्वांच्या सहकार्याने आपण दुप्पट वेगाने पुढे जाऊ हा विश्वास वाटतो!

डॉ. प्रसन्न पाटील
prasanna.vpp@gmail.com



# सेवांकुर एक चळवळ - भाग १ चळवळीची पार्श्वभूमि

'सेवांकुर' ही चळवळ महाराष्ट्रातील जवळपास सर्व वैद्यकीय महाविद्यालयात तिच्या 'वन विक फॉर नेशन"(एक सप्ताह देश के नाम') या वैशिष्ठ्यपूर्ण उपक्रमामुळे परिचित झाली आहे. साधारण २४ वर्षापूर्वी म्हणजे १९९६-९७ च्या दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद (महाराष्ट्र) येथे काम करणाऱ्या काही तरुण डॉक्टरांना आठवड्यातून एक दिवस संध्याकाळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलांच्या वसतीगृहात जाऊन सहज संपर्क करावा असे वाटले. कां बरे असे वाटले?

**१९८८ मध्ये वैद्यकीय क्षेत्रात काही तरी वेगळे करुन दाखवावे ही कल्पना सात तरूण डॉक्टरांच्या मनात रुजविली, त्याकाळच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील कार्यकर्त्यांनी !**

त्यांचे वसतीगृहात सातत्याने जाणे-येणे होते. प्रेरणादायी पुस्तकांच्या वाचनांतून, सेवाप्रकल्पांच्या दर्शनाने हे स्फुल्लिंग जागवले ! त्यातून सात तरूण डॉक्टर व चार संघ कार्यकर्ते यांनी १९८८ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान या विश्वस्त संस्थेची स्थापना मराठवाड्यातील औरंगाबाद येथे केली. हे नाव देतांना खूप विचारमंथन झाले. मराठवाडा विद्यापीठास प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव देण्यात यावे ही मागणी समाजातून पुढे आली होती. या मागणीसाठी समाजात मोठे आंदोलन उभे झाले. रा.स्व.संघाने या आंदोलनांस बिनशर्त पाठींबा दिला. अनेकांनी या मागणीकडे राजकीय दृष्टीकोनातून पाहून समाजात दुफळी निर्माण करून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला. सामाजिक एकोपा नष्ट होईल व विद्वेषाचे वातावरण तयार होईल असेही प्रयत्न समाजात होताना या तरूण डॉक्टरांनी पाहिले.






**डॉ. हेडगेवारांचा जन्म १८८९ सालचा. १९८९ मध्ये त्यांच्या जन्माला १०० वर्षे पूर्ण होत होती. डॉ.हेडगेवारांच्या जन्मशताब्दी वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान पहिल्या सेवाप्रकल्पाचा प्रारंभ होणार होता म्हणून त्याचे नांव 'डॉ.हेडगेवार रुग्णालय" असे ठेवण्यात आले. काम करणारे सर्व डॉक्टर्स बालपणापासून संघ स्वयंसेवक तर होतेच !**



Dr. A. D. Tupkary
सेवांकुर संस्थापक आणि मार्गदर्शक
Ashwinikumar-tupkary@hedgewar.org

समाजजीवन निर्दोष, शोषणमुक्त व समरसतायुक्त असावे यासाठी प. पू. डॉ. आंबेडकरांनी आपले जीवन खर्च केले त्यांचे नाव कोणताही गाजावाजा न करता या तरुण डॉक्टरांनी आपल्या संस्थेला देवून समरसतेस पूरक आपला खारीचा वाटा कृतीतून उचलला.
डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नागपूर येथे स्थापना केली. डॉ. हेडगेवारांचा जन्म १८८९ सालचा. १९८९ मध्ये त्यांच्या जन्माला १०० वर्षे पूर्ण होत होती. डॉ.हेडगेवारांच्या जन्मशताब्दी वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान च्या पहिल्या सेवाप्रकल्पाचा प्रारंभ होणार होता म्हणून त्याचे नाव 'डॉ.हेडगेवार रुग्णालय" असे ठेवण्यात आले. काम करणारे सर्व डॉक्टर्स बालपणापासून संघ स्वयंसेवक तर होतेच !
१९८९ साली गोकुळाष्टमीला डॉ.हेडगेवार रुग्णालयाचा प्रारंभ झाला. पहिले ५-७ वर्षे काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांच्या दर तीन महिन्यांनी बैठका होत असत. "चार भाऊ एकत्र राहू शकत नाही तेव्हा हे सात डॉक्टर कसे काय एकत्र राहातील?" असे सूर समाजातून ऐकू येत होते.
पण संघ संस्कारांचा परिणाम काय असतो ते त्यांना नंतर लक्षात आले व तोच समाज असे म्हणू लागली की, 'तुम्ही मनांत आणले तर कोणतेही काम करणे शक्य आहे.' पहिले ७-८ वर्षे प्रकल्प स्थिरावण्यासाठी गेले. १९९५-९६ ला आपल्या रुग्णालयाला जागा पूरत नाही, मोठी जागा पाहिजे व मोठ्या जागेत काम करण्यासाठी नवीन डॉक्टर पाहिजे अशी चर्चा सुरू झाली. स्वार्थाने प्रारंभ झालेली ही चर्चा, संपूर्ण समाजाला सेवा मिळावी यासाठी आपण काय काय करू शकतो इथं पर्यंत आली. या दिशेला गेली व निःस्वार्थतेत रुपांतरित झाली. सर्वांच्या कल्याणाचा विचार सुरु झाला. आपली संस्था कितीही मोठी झाली तरी ती संपूर्ण भारतातील सर्व लोकांना सेवा देऊ शकणार नाही याची जाणीव काम करणाऱ्या डॉक्टरांना झाली. सर्वच डॉक्टर सेवाभावी झाले तर प्रत्येकाला उत्तम सेवा मिळेल असा विचार पुढे आला. भावी डॉक्टर कोठे तयार होतात? म्हणून वैद्यकीय महाविद्यालयात संपर्क करण्याची कल्पना पुढे आली. प्रायोगिक तत्वावर काही कृती करून अनुभव घेण्याचे ठरले. नवीन पिढी कसा विचार करते हे समजून तर घ्यावे या हेतूने साप्ताहिक संपर्काला १९९७ मध्ये प्रारंभ झाला. एकदम अनौपचारीक संपर्क करावा असे ठरले. .............. (क्रमशः)

# डॉ. हेडगेवार रुग्णालय आणि सेवांकुर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. हेडगेवार रुग्णालयाची सुरुवात सन 1989 ला झाली

**न त्वहम् कामये राज्यम् न स्वर्गम् न पुनर्भवम्।**
**कामये दु:खतप्तानम् प्राणिनामार्तिनाशनम्।।**



दु:खी कष्टी मानवांचे दु:ख हरण करण्याचे ध्येय घेऊन रुग्णालयाचा पाया रचला गेला. नविनच प्रयोग होता तो आणि धाडसीदेखील. मध्यमवर्गीय सात ध्येयवेड्या डॉक्टरांनी एकत्र येऊन वैद्यकीय सेवा देणे हे शहराकरिता नवलच होते. त्यावेळी औरंगाबाद शहरात तशी प्रथा नव्हती. या डॉक्टरांना केवळ वैद्यकीय सेवा देण्यात रस नव्हता, तर त्यांना एकूण समाजाची स्थिती सुधारायची होती. वाजवी दरात योग्य वैद्यकीय सेवा देऊन त्यातून सामाजिक परिवर्तनास चालना देणे हा त्यांचा व्यापक दृष्टिकोन होता. समाजाच्या सर्व प्रश्नांचा त्यांचा अभ्यास होताच असे नाही, मात्र इच्छाशक्ती दुर्दम्य होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठानने दत्ताजी भाले रक्तपेढी व डॉ. हेडगेवार रुग्णालय औरंगाबाद, श्री गुरुजी रुग्णालय नाशिक, स्वर्गदेव सू.का.फा. हॉस्पिटल शिवसागर आसाम असे विविध वैद्यकीय प्रकल्प उभे केले. त्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प म्हणजे सेवांकुर !

वैद्यकीय सेवा देताना ती पारदर्शी, आपुलकीची व नैतिक असावी या तत्वांवर डॉ. हेडगेवार रुग्णालयाची वाटचाल सुरू झाली होती. परंतु या भावनेने समाजातील इतर सर्व वैद्यकीय व्यावसायिक सेवा देत होते का? दुर्दैवाने या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी होते. 'आपणासारखे सोडून जावे सकळजन !' या उक्तीप्रमाणे समाजातील वैद्यकीय क्षेत्रात नैतिक आचरण, समाजाबद्दलची आपुलकी वृध्दींगत व्हावी या उद्देशाने १९९५ साली सेवांकुर या चळवळीची सुरुवात झाली.

लहानपणी मिळालेल्या संस्कारांची शिदोरी पुढे आयुष्यभर टिकते, त्यामुळेच वैद्यकीय विद्यार्थ्यांपासून सुरुवात करावी असे डॉ. हेडगेवार रुग्णालयातील डॉक्टरांनी ठरविले. विद्यार्थ्यांच्या अनौपचारिक भेटी घेणे, त्यांच्या सुखदु:खाच्या प्रसंगी साक्षीदार असणे अशा निरपेक्ष मैत्री मधून हे काम वाढत गेले. २००६ साली संपूर्ण महाराष्ट्रातील ३०० विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण औरंगाबाद येथे झाले व त्यानंतर सेवांकुरचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचले. २०१५ सालापासून नवनवीन कार्यक्रमांमधून सेवांकुर केवळ ॲलोपॅथी नव्हे तर आयुर्वेद, होमिओपॅथी ,फिजिओथेरपी,डेंटल या इतर वैद्यकीय शाखांमध्ये देखील लोकप्रिय झाले. २०२० साली संपूर्ण महाराष्ट्राची कार्यकारिणी मध्यवर्ती कार्यकारी मंडळ तयार होऊन या चळवळीला आता औपचारिक स्वरुप प्राप्त झाले आहे. असे कार्यकारी मंडळ करण्यात पुण्यातील सुप्रसिद्ध **HR consultant माननीय माणिकताई दामले** व त्यांचे सहकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सेवांकुरच्या या सर्व टप्प्यांचे डॉ हेडगेवार रूग्णालय केवळ साक्षीदार नसून, रूग्णालयाच्या सहभागा शिवाय हे शक्य झाले नसते. केवळ आर्थिक पाठबळच नव्हे, तर रूग्णालयातील तज्ञ डॉक्टर आपला मौल्यवान वेळ देखील सेवांकुरसाठी देतात. विद्यार्थ्यांशी मैत्री करतांना आपले सामाजिक स्थान, प्रतिष्ठा आड येऊ देत नाही. आपल्या कुटुंबात विद्यार्थ्यांना सहजपणे समाविष्ट करून घेतात. त्यामध्ये कुठलाही संकोच बाळगत नाहीत.



Dr. Avinash Buche
सेवांकुर व डॉ. हेडगेवार रुग्णालय समन्वयक
avinashbuche@gmail.com

**सेवांकुरच्या या सर्व टप्प्यांचे डॉ हेडगेवार रूग्णालय केवळ साक्षीदार नसून, रूग्णालयाच्या सहभागा शिवाय हे शक्य झाले नसते. केवळ आर्थिक पाठबळच नव्हे, तर रूग्णालयातील तज्ञ डॉक्टर आपला मौल्यवान वेळ देखील सेवांकुरसाठी देतात. विद्यार्थ्यांशी मैत्री करतांना आपले सामाजिक स्थान, प्रतिष्ठा आड येऊ देत नाही. आपल्या कुटुंबात विद्यार्थ्यांना सहजपणे समाविष्ट करून घेतात. त्यामध्ये कुठलाही संकोच बाळगत नाहीत. सहाजिकच सेवांकुर म्हणजे हेडगेवार रूग्णालय हे समीकरण रूढ झाले आहे.**

सहाजिकच सेवांकुर म्हणजे हेडगेवार रूग्णालय हे समीकरण रूढ झाले आहे. मात्र एखाद्या चळवळीला चौकटीत बंदिस्त करणे योग्य नाही याची देखील रुग्णालयातील डॉक्टरांना जाणीव आहे. सेवांकुर हे काम समाजासाठीचे आहे. समाजातील सर्व डॉक्टरांचा यातील सहभाग वाढावा या उद्देशाने सेवांकुरने रूग्णालया बाहेरील डॉक्टरांना आवाहन केले व त्याला भरभरून प्रतिसाद मिळतो आहे. केवळ आर्थिक मदतच नव्हे तर स्वत:चा वेळ ही देण्यासाठी समाजातील अनेक मान्यवर डॉक्टर पुढे येत आहेत.

सेवांकुरच्या सर्वच उपक्रमांमध्ये व्यवसायिक डॉक्टरांचा तन, मन, धनाने सहभाग असतो व उत्तरोतर वाढतो आहे. औरंगाबाद सहीत मुंबई, पुणे, अकोला, बीड, लातूर याही शहरांमधून डॉक्टरांचा सहभाग लक्षणीय असतो. दरवर्षी सेवांकुरच्या “One week for nation” या उपक्रमात डॉ. हेडगेवार रुग्णालयातील विविध विभागांमधून तज्ञ डॉक्टर सहभागी होतातच त्याबरोबर रुग्णालयाबाहेरील व्यवसायिक डॉक्टर देखील आनंदाने सहभागी होतात. फेब्रुवारी २०२० साली आलेल्या one week for nation या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध शहरांतील १५ खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनी सहभाग नोंदवला होता, आणि एक आठवडयाकरिता आपली खाजगी प्रॅक्टिस बंद करून विद्यार्थ्यांच्या मनावर समाजसेवेचा संस्कार केला. समाजात असलेली सज्जनशक्ती जितकी या कामात लागेल तितका सेवांकुरचा विस्तार होइल, अधिकाधिक लोकोपयोगी कामे सेवांकुरांमधील विद्यार्थी व डॉक्टर वर्गाकडून होइल. भविष्यात अशाप्रकारे वाटचाल राहिल्यास सेवांकुर हा केवळ डॉ. हेडगेवार रुग्णालयाचा उपक्रम न राहता सर्व वैद्यवकीय क्षेत्राचा उपक्रम होईल यात शंका नाही. अशाप्रकारच्या उपक्रमात आपणांसाही सहभागी व्हायचे असेल तर **www.sevankurbharat.org** या संकेतस्थळावर Registration करावे आणि या समाजोपयोगी कार्यात आपला सहभाग देखील नोंदवावा.

# श्री गुरुजी रुग्णालय नाशिक



## समाजासाठी पाहिलेल्या स्वप्नांची संकल्पसिद्धी....

देहाकडून देवाकडे जाताना वाटेत देश लागतो... भारत माझा देश आहे... सारे भारतीय माझे बांधव आहेत.... या समाज बांधवांचे.... या समाजाचे.... मी काही देणे लागतो, अशी संस्कारित मने ज्यांची होती, अशा सात डॉक्टरांनी स्वत: चे वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, औरंगाबाद येथे समाजाभिमुख वैद्यकीय व्यवसाय सुरु केला. वैद्यकीय सेवेचे हे युनिट आज डॉ बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान चे डॉ हेडगेवार रुग्णालय म्हणून सर्वपरिचित, सुपरिचित आहे. रुग्णालयात काम करणारी ही मंडळी यावर संतुष्ट झाली नाहीत. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या पुढील पिढ्या सुद्धा असा विचार करू शकतात का? त्यांच्यातला हा भाव कोण जागृत करणार? तो कसा करायचा? याचे विचार मंथन झाले व तेव्हाच खऱ्या अर्थाने सेवांकुर चा प्रवास सुरु झाला आणि ही धुरा सांभाळली डॉ. अश्विनीकुमार तुपकरी सरांनी.

मग मेडिकल कॉलेजच्या होस्टेलमध्ये साप्ताहिक भेटी सुरू झाल्या. वारंवार होणाऱ्या भेटी, सहप्रवास, सहनिवास, सहभोजन यांनी स्नेह वाढत गेला. कालांतराने काही विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी बाहेर गेले, त्यात मुंबईला एक मोठा गट होता. त्यांचा तुपकरी सरांशी भलेही नित्य संपर्क नव्हता पण तेथील स्थानिक काही समविचारी मंडळी, काही संघाचे अधिकारी, त्यांच्याशी नित्य संपर्कात होते. तुपकरी सरांच्या होस्टेलच्या साप्ताहिक भेटी सुरूच होत्या.



दरम्यान च्या काळात एक घटना घडली, डॉ हेडगेवार रुग्णालयाला अमेरिकेच्या एका दात्या कडून रेडिओथेरपी (कॅन्सर) मशीन मिळण्याचा प्रस्ताव आला, तेव्हा डॉ तुपकरी सर आणि डॉ क्षीरसागर सर त्यांच्या संपर्कातील एका विद्यार्थ्याला भेटायला मुंबईला गेले, त्याचे नाव डॉ. गिरीश बेद्रे. ते टाटा मेमोरियल हॉस्पिटल मध्ये कॅन्सर विषयात एमडी करण्यासाठी नुकतेच रुजू झाले होते. डॉ गिरीश आपल्या रुग्णालयात किरणोपचार विभागाची जवाबदारी घेणार का? असे विचारताच डॉ गिरीश सरांनी लगेच होकार दिला, पण शिक्षण पूर्ण करून जवाबदारी घेणे याला जवळपास तीन वर्षे लागणार होती, याशिवाय दुसरी एका मोठी समस्या होती ती म्हणजे या मशीनसाठी लागणारे बांधकाम आणि इतर तांत्रिक बाबी पूर्ण करणे याला पण बराच वेळ लागणार होता, त्यामुळे मशीन स्वीकारावी अशी अनुकूलता दिसेना. तेव्हा तुपकरी सरांनी एक मुद्दा उपस्थित केला, डॉ हेडगेवार रुग्णालयातच हे काम केले पाहिजे असा आग्रह कशाला? विद्यार्थ्यांच्या या गटाने ठरविले तर नवे रुग्णालयच सुरू करता येऊ शकते. मांडलेला मुद्दा शक्यता म्हणून आजमावून बघायला काय हरकत आहे ? बघू एकदा भेटून, गोष्ट सोपी नव्हती, पण अगदी अशक्यही नव्हती. ठरले तर मग, विचार मंथन करण्यासाठी एकदा भेटायचे. बैठक निश्चित झाली, भेटी सुरू झाल्या, बैठकीत झालेली चर्चा प्रकल्पाचा हेतू आणि दिशा ठरविणारी होती. वाजवी शुल्क आकारून दर्जेदार रुग्णसेवा देणारा प्रकल्प उभा करायचा असे ठरले.  तर त्यात सहभागी होण्यास कोण कोण इच्छुक आहे? त्यासाठी पक्का शब्द देण्याची कोणाची तयारी आहे? कोणत्या संघटनेमार्फत हा प्रकल्प उभा करता येईल? त्यासाठी लागणारी आर्थिक जुळवाजुळव कशी करायची? हे काम शहरात करायचे की ग्रामीण भागात? असे बरेच काही थेट आणि विस्ताराने बोलणे गरजेचे होते. प्रकल्प सुरू करण्याबाबत कोणाचेही दुमत नव्हते पण कोणाच्या मार्फत तो उभा करायचा, कुठल्या बॅनरखाली तो सुरू करायचा यावर चर्चेअंती, डॉ हेडगेवार रुग्णालयाच्या धर्तीवर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने, आणखी एक रुग्णालय सुरू करायचे असे ठरले. संघामार्फत अनेक वर्षांपासून सेवा क्षेत्रात देशभरात चालू असलेली हजारो कामे आणि त्यात सहभागी स्वयंसेवकांचा अनुभव, अशा प्रकारच्या कामासाठी आवश्यक असणारी दृढ वैचारिक बैठक, संघाकडे आहे हे वेळोवेळी अधोरेखित होत होते.

